नियमीत दिवाणी दावा क्र. ७/२०२३
बबलु यादव वि. अशोक यादव
निशाणी क्र. २४ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र. १**

**शपथेवर पुढील उलटतपास सुरु :–**
**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री. ए. एम. देवळे यांच्यामार्फत :–**

१९) मी पाचवीपर्यंत शिकलो आहे. मी दुधाचा व्यवसाय करतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासामध्ये माझा व्यवसाय शेती असे नमुद आहे परंतु मी शेती करत नाही. मी गेले २० ते २५ वर्षे दुधाचा व्यवसाय करत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या दाव्यामध्ये मी व्यवसाय करतो असे नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे शेती नाही असे भासवण्याकरीता मी दाव्यामध्ये घरकाम असा व्यवसाय दाखवला आहे. माझी संपूर्ण शेती परसोडा येथे आहे. शोभाराम यादव हे माझे आजोबा होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासामध्ये माझ्या आईचे नाव कलाबाई असल्याचे नमुद आहे परंतु दाव्यात तसे नमुद नाही व त्याचे काही वेगळे असे कारण नाही.

२०) शोभाराम यांना ५ मुलं नामे गणेश, चैतराम, महादेव, बुद्धुलाल व सुखलाल होती. मी आणि अशोक सावत्र भाऊ आहोत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २ ते ६ हेदेखील अशोकचे सावत्र भावंड आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी केवळ अशोक यांना वाटणी मागण्याकरीता नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे आहे की, मी प्रतिवादी क्र. २ ते ६ यांना वाटणीच्या मागणीची नोटीस पाठवली नव्हती. मी शेतसर्वे नं. ९८ आणि ८८ या शेतीच्या वाटणीची मागणी करण्याकरीता नोटीस पाठवली होती. मी ९८/२ या शेतजमिनीकरीता नोटीस पाठवली होती. माझा शेतजमिनीमध्ये वाटणी होण्यापूर्वी किती हिस्सा येतो हे मला आता सांगता येणार नाही. मी सम हिस्सा मागितलेला आहे. मी किती

हिस्सा येतो हे सांगू शकत नाही.

२१}	हे मला माहित नाही की, शेतसर्वे नं. ९८/२ आराजी ३.१९ एकर हे शेत माझे वडील महादेव यांच्या मालकीचे होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे शेतजमीन मी जोत करतो. मी पापालाल गणेश यादव आणि राधेश्याम गणेश यादव यांना ओळखतो. हे मला माहित नाही की, शेतसर्वे क्र. ९८/२ याच्या ७/१२ उताऱ्यावर चुकून पापालाल व राधेश्याम यांची नावे लागलेली आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, ९८/२ हे माझ्या वडीलांच्या मालकीचे होते व आता मी जोत करत असून देखील सदरची शेत जमीन मी दाव्यात सामील केलेली नाही.

२२}	हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. १ अशोक हा महादेव यांच्या पहिल्या पत्नीचा मुलगा आहे व मी आणि प्रतिवादी क्र. २ ते ६ हे दुसऱ्या पत्नीचे मुले आहोत. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि प्रतिवादी क्र. २ ते ६ यांची नावे चुकीने वादमिळकतींवर लागलेली असल्याने मी त्याच्यात हक्क सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अशोक यांची औरस संतान नसल्याने मला सदर वादमिळकतींमध्ये कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ७ कलाबाई यांचा देखील वादमिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील महादेव हे सन १९८३ मध्ये मरण पावले. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांचा मृत्यु माझ्या वडीलांच्या मृत्युआधीच झाला होता.

२३}	हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांच्या मृत्युनंतर मी सज्ञान झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ अशोक यांच्याकडे वाटणी मागितली होती. हे म्हणणे खरे आहे की, परंतु त्यावेळी प्रतिवादी क्र. १ अशोक यांनी वाटणी देण्यास मला हक्क नाही म्हणून नकार दिला होता. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर देखील मी अनेक वेळा अशोककडे वाटणी करून मागितली होती परंतु त्याने प्रत्येक वेळी माझा हक्क नाकारून स्वतः एकटा मालक आहे असे सांगून वाटणी देण्यास नकार दिला. हे म्हणणे खरे नाही की, शेतसर्वे क्र. ९८/४ आराजी २ हेक्टर ही जमीन मी माझ्या चुलत भावाच्या मदतीने अरुण चिरंजीलाल

सिंघानीया यांना विकली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला वादमिळकतीमध्ये कोणताही अधिकार नाही व केवळ प्रतिवादींना त्रास देण्याकरीता मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास पूर्ण.</u>**

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

सही/-

रामटेक. (ए. ए. शिरवळकर)

दिनांक : १२/०३/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक.